महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये शासन निदेश...

राज्यातील **मंजूर प्रादेशिक योजना** क्षेत्रात "शेती तथा ना-विकास विभाग" या वापर विभागामध्ये औद्योगिक वापरासाठी वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करताना आकारावयाच्या अधिमूल्य दरामध्ये सुधारणा करण्याबाबत......

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२
**दिनांक : २१/०१/२०१६**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

**क्र.टिपीएस-१८१४/प्र.क्र.२४३/१३/कलम १५४/नवि-१३:-** ज्याअर्थी, शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २०, पोटकलम ४ मधील तरतूदींनुसार (यापुढे ज्याचा उल्लेख उक्त अधिनियम असा करण्यात आलेला आहे) पुणे मंजूर प्रादेशिक योजनेमधील ना-विकास या जमीन वापर विभागामध्ये औद्योगिक वापर व त्यांच्या इमारतींसाठी (यापुढे जिचा उल्लेख उक्त वापर असा करण्यात आलेला आहे)अधिमूल्य आकारुन वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करण्यासंदर्भात नविन विनियमास शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१४/९१६/.क्र.२४३/१४/नवि-१३, दि.०५/०६/२०१५ रोजी अंतिमरित्या मान्यता दिलेली आहे (यापुढे जिचा उल्लेख उक्त अधिसूचना असा करण्यात आलेला आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त वापर अनुज्ञेय करताना शासनाने उक्त अधिसूचनेद्वारे मंजूर केलेल्या संभाव्य बिनशेती दराऐवजी संबंधित जमिनीचे दर विचारात घेऊन अधिमूल्य आकारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती;

त्याअर्थी, शासनाने निर्गमित केलेल्या दि.०५/०६/२०१५ रोजीच्या अधिसूचनेसोबतच्या अनुसूची-ब मधील अट क्र.१ या ठिकाणी नमूद केल्यानुसार आकारावयाच्या अधिमूल्य दरामध्ये खालील तक्त्यात रकाना क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारणा करण्यात येत असून सुधारणेनुसार कार्यवाही करण्याचे **निदेश** उक्त अधिनियमाचे **कलम १५४** अन्वये देण्यात येत आहेत:-

| शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१४/९१६/ प्र.क्र.२४३/१४/नवि-१३, दि.०५/०६/२०१५ सोबतच्या अनुसूची-ब मधील अट क्र.१ (रकाना क्र.१) | शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१४/प्र.क्र.१२० /१४/कलम २०(४)/नवि-१३, दि.०५/०६/२०१५ सोबतच्या अनुसूची-ब मधील **सुधारीत** अट क्र.१ (रकाना क्र.२) |
|---|---|
| 1. The additional FSI as mentioned in Column No.4 of the Table above is to be granted only on payment of premium at the rate of 30% of the non-agriculture potential land rate of the said land or if such rate is not available then adjoining rate of non-agriculture potential land as prescribed in the ASR of the year of granting such additional FSI. Such premium shall be deposited in the concerned Branch Office of the Town Planning Department / concerned Authority wherever applicable | 1 The additional FSI as mentioned in Column No.4 of the Table above is to be granted only on payment of premium calculated considering *30% rate of the said land* as prescribed in the ASR of the year of granting such additional FSI. Such premium shall be deposited in the concerned Branch Office of the Town Planning Department / concerned Authority wherever applicable. *The land area consider for premium shall be equal to additional FSI / built-up area granted*. |

| | |
|---|---|
| 3. All other regulations as applicable to Industrial Zone shall apply to the building constructed under these regulations. | 3.. All other regulations as applicable to Industrial Zone shall apply to the building constructed under these regulations. *The industrial layout / industrial sub-division shall also be permissible subject to respective regulations of Industrial Zone.* |

सदरहू निदेश शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे / नियम येथे) या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sanjay Balkrishna Saoji

Digitally signed by Sanjay Balkrishna Saoji
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=UNDER SECRETARY, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=13f024b79c19b420653021e52311db55b7964b2bc5c3642efdb26f8633f8af7f, serialNumber=be169cc754827a9bfadc916ac5c85a4c876ae29f24ca9e6f7c2064ada52d6747, cn=Sanjay Balkrishna Saoji
Date: 2016.01.21 10:00:43 +05'30'

**(संजय सावजी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.राज्यमंत्री, (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति,**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सह संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
५) विभागीय आयुक्त, पुणे.
६) जिल्हाधिकारी, पुणे.
७) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे / नगर रचनाकार, बारामती शाखा, बारामती.
८) कक्ष अधिकारी (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे शासन निदेश या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.
९) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई - त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे शासन निदेश शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावेत.
१०) निवड नस्ती (कार्यासन-१३).

*******